राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या **सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम..**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र. ०३ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२६/०५/२०२६

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) .

**विषय** - राज्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीतमुदत संपणाऱ्या,नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम..

**संदर्भ** - १. ग्राम विकास विभागाचे क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/ई-१४०९६२३/पं.रा.-२, दि. १७/०२/२०२६ रोजीचे प्रभाग रचनेचे आदेश.
२. ग्राम विकास विभागाचे क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३/रा.२/दि. ०४/०५/२०२६ चे पत्र व त्यासोबतचे दिनांक ३०/०४/२०२६ चे शुध्दीपत्र.
३. ग्रामविकास विभागाचे क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/पं.रा.२ / (ई-१४०९६२३) दि.०८/०५/२०२६ अंतीम प्रभाग रचना प्रसिध्द केल्याचा अहवाल.
४. राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०४/का.०८, दिनांक २५ /०५/२०२६ चे आदेश.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

राज्यातील सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेसाठी ग्रामविकास विभागाने दिनांक १७/०२/२०२६ रोजी दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार दिनांक २८/०४/२०२६ रोजी प्रभाग रचनेची अंतिम मान्यता होऊन, या प्रभाग रचनेस दिनांक ०४/०५/२०२६ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात आली असून १४,३१४ ग्रामपंचायतींची प्रभाग रचना पुर्ण झाल्याचे संदर्भीय क्र.३ अन्वये ग्रामविकास विभागाने कळविले आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार या ग्रामपंचायतींपैकी बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी जागा आरक्षित करण्याची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी जागा आरक्षित करण्याचे अधिकार आयोगाने दि. २७ जानेवारी,१९९५ च्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

ग्राम विकास विभागाने, शासन अध्यादेश क्र. ३, दिनांक २३/०९/२०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० च्या पोटकलम (२)(क) मध्ये **"नागरिकांच्या मागसवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतींमधील निवडणुकीव्दारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, पंचायतीमधील वेगवेगळया प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील** अशी सुधारणा केली आहे. या अध्यादेशाचे सन २०२२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१९,दि. ०१/०२/२०२२ मध्ये रुपांतर करण्यात आले.

शासन अध्यादेश क्र.३, दिनांक २३/०९/२०२१ यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २४/११/२०२१ रोजी "ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश - २०२१"निर्गमित केले होते. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश विचारात घेऊन दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ रोजी प्रभाग रचना व आरक्षणाचे अंशत: सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११/०३/२०२२ च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (१) मधील, खंड (ब) मधील "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल." अशी दुरुस्ती करुन **प्रभाग रचनेचे अधिकार शासनाकडे निहित** केले आहे;

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. २८/११/२०२५ रोजी ३२ जिल्हापरिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांपैकी फक्त ज्या जिल्हापरिषद/ पंचायत समित्यांनी ५०**%** आरक्षणाची मर्यादा ओलांडलेली नाही, अशा ठिकाणी निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार राज्यातील १२ जिल्हापरिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या असून ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडणाऱ्या २० जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत.

**त्यामुळे नागरिकांच्या मागसवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतींमधील एकूण जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्ग यांचे एकत्रित आरक्षण) एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (२) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीतील सदस्यांचे **आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे** निहित असल्यामुळे तसेच **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिका विचारात घेऊन** दिनांक २४/११/२०२१, दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ रोजीचे प्रभाग रचना व आरक्षणाचे आदेश अधिक्रमित करण्यात आले असून **बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्रामपंचायतींसाठी आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याचे आदेश -२०२६ दि.२५/०५/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.**

सन २०२४ मध्ये मुदत संपलेल्या १५८४ व सन २०२५ मध्ये मुदत संपलेल्या ८९ ग्रामपंचायतींमध्ये समर्पित आयोगाने (बांठिया आयोग) केलेले शिफारशीनुसार नागरिकांच्या मागासवर्गासाठी आरक्षण निश्चित केले असून अनुक्रमे दिनांक २३/०२/२०२४ व दिनांक २४/०३/२०२५ रोजी आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्यामुळे उक्त बाबी विचारात घेता **अंतिम आरक्षणाची सदर अधिसूचना रद्द** करुन नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित जागा एकूण जागेच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही, यासाठी **नव्याने आरक्षणाची प्रक्रिया** राबविणे आवश्यक आहे.

**त्यामुळे राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व सन २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे १५६३६ ग्रामपंचायतींसाठी आरक्षणाचा कार्यक्रम राबविणे क्रमप्राप्त आहे.**

सबब, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन** राहून, **सन २०२४ व सन २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या, बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सुमारे १५६३६** ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक घेण्याच्यादृष्टीने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी खालील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

## आदेश

१. **ग्रामपंचायतींची निवडणुक प्रक्रिया निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुक प्रक्रिया योग्यप्रकारे पार पाडाव्यात.**

२. महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार (बिगर/अंशत: अनुसूचित क्षेत्रामध्ये) नागरिकांच्या मागसवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतींमधील निवडणुकीव्दारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग यांचे एकत्रित आरक्षण) पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

३. **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश २०२६, दिनांक २५/०५/२०२६ मध्ये आरक्षणाची सविस्तर कार्यपध्दती नमूद केली असून या कार्यपध्दतीनुसार** आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी.

४. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार पार पाडण्यात यावा.

५. **संदर्भ क्रमांक ४ वरील दि.२५/०५/२०२६ च्या आदेशातील परिशिष्ट ८ नुसार ग्रामपंचायत आरक्षणाचे संपूर्ण विवरणपत्र तयार करण्यात यावे. परिशिष्ट १० नुसार आरक्षणाची प्रारुप अधिसुचना (नमूना ब) व परिशिष्ट १३ नुसार आरक्षणाची अंतिम अधिसुचना (नमूना अ) प्रसिध्द करण्यात यावी.**

६. संबंधित तहसिलदार यांनी या प्रारुप अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणच्या नोटीस बोर्डवर द्यावी.

७. विशेष ग्रामसभेत पार पाडलेल्या आरक्षण सोडतीअंती आरक्षणावर हरकती व सूचना तहसिल कार्यालयात कार्यालयीन वेळेत मागविण्यात याव्यात. तहसिलदार यांनी प्राप्त हरकती उपविभागीय अधिकारी यांना अभिप्रायासाठी सादर कराव्यात. उपविभागीय अधिकारी यांनी आवश्यक तपासणी करून त्यांचे अभिप्राय देऊन जिल्हाधिकारी यांना **अंतिम** अधिसूचनेस मान्यता देण्यासाठी सादर कराव्यात व जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अधिसूचना **अंतिम** करण्यास मान्यता द्यावी.

८. अंतिम अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

९. उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी. उक्त कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.

१०. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार **आरक्षणाचा कार्यक्रम** राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

(सुरेश कांकाणी) २६.०५.२०२६

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र – परिशिष्ट अ**

प्रती -

१. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२ .प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३. विभागीय आयुक्त (सर्व),

४. जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७. सर्व निवडणूक कार्यासने

८. निवड नस्ती.

## परिशिष्ट अ

## निवडणुकीस पात्र असलेल्या, बिगर व अंशत: अनुसूचित ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

| सदस्यांची आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे (आरक्षणाची सोडत काढण्याकरीता) | ०८/०६/२०२६ (सोमवार) |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढणे ( अनु.जाती, अनु.जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनु.जाती महिला, अनु.जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) | १२/०६/२०२६ (शुक्रवार) |
| iii) प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला (नमुना ब) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | १७/०६/२०२६ (बुधवार) |
| iv) प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | १९/०६/२०२६ (शुक्रवार) |
| v) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | १९/०६/२०२६ (शुक्रवार) ते २५/०६/२०२६ (गुरुवार) |
| vi) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | ०३/०७/२०२६ (शुक्रवार) |
| vii) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | ०८/०७/२०२६ (बुधवार) |
| viii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | १०/०७/२०२६ (शुक्रवार) |

२८.०५.२०२६

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र